# मराठी साहित्य

## रूप आणि रंग

संपादक
डॉ. सतीश कामत

शब्दालय प्रकाशन

CamScanner

● *Marathi Sahitya : Rup Ani Rang*
*Sampadak : Dr. Satish Kamat*

● मराठी साहित्य : रूप आणि रंग
संपादक
डॉ. सतीश कामत

● © सर्व हक्क सुरक्षित

● प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२३

● प्रकाशक
सुमती लांडे
शब्दालय प्रकाशन,
पोस्ट बॉक्स क्रमांक ९०, वॉर्ड ७,
श्रीरामपूर - ४१३ ७०९
दूरभाष: ०२४२२-२१०४२५
भ्रमणध्वनी : ९८२२००८७९६,
९८२२५२५४४४

● मुखपृष्ठ रचना : कृष्णा माळवे

● अक्षरजुळणी :
अक्षर कॉम्प्युटर, श्रीरामपूर

● मुद्रक
समर्थ ऑफसेट, पुणे

● मूल्य : ३२० रुपये

● प्रकाशन क्रमांक : ६१५

● ISBN : 978-81-959792-5-7

'मराठी साहित्य : रूप आणि रंग' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांचे असून त्याच्याशी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत व जबाबदार असतीलच असे नाही.

**email-shabdalaya@gmail.com**
**www.shabdalaya.com** **www.facebook.com/shabdalaya**
**Bookganga, Flipkart, Amazon Kindle**
या वेबसाईटवर पुस्तके व ई-बुक्स ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध

CamScanner

# ८.

# मराठी कथा : स्वरूप आणि संकल्पना

डॉ.अनिल बांगर

## प्रास्ताविक

प्रत्येक साहित्यप्रकाराला ऐतिहासिक आणि तात्त्विक अशी दोन अंगे असतात. ही दोन अंगे सतत परस्परांची जडणघडण करीत असतात. म्हणजेच एखाद्या साहित्यप्रकारात निर्माण होणाऱ्या अनेक साहित्यकृती आणि त्या साहित्यकृतीच्या आश्रयाने आकारत जाणारी त्या विशिष्ट साहित्यप्रकाराची तात्त्विक संकल्पना या दोन्ही वाङ्मय कालौघात परस्परांवर सतत संस्कार करीत असतात आणि परस्परांची जडणघडण करीत असतात.

एखाद्या साहित्यप्रकाराच्या स्थित्यंतरक्रमाचा परामर्श म्हणजे त्याचा ऐतिहासिक अंगाने केलेला विचार होय. आणि त्या साहित्य प्रकाराच्या स्वरूपलक्षणांचा परामर्श हे त्याचे तात्विक अंगाने केलेले विवेचन म्हणता येईल. ही दोन अंगे सतत परस्परांची जडणघडण करीत असल्याने ती तत्त्वत: एकमेकापासून पूर्णपणे विलग असू शकत नाहीत. त्यांना स्वभाविकपणेच परस्परांचा संदर्भ असतो. तेव्हा कथा या साहित्य प्रकाराचा तात्त्विक अंगाने विचार करताना तिच्या ऐतिहासिक अंगाचे अवधान राखणे योग्य ठरेल.

कथात्म साहित्याचा एक स्फुट प्रकार या दृष्टीने कथा या वाङ्मयप्रकाराचा विचार केला जातो. गोष्ट सांगणे हे कथेचे प्रारंभिक प्रयोजन आहे. मानवी जन्मापासूनच कुणीतरी कुणाला गोष्ट सांगण्याची पद्धत रूढ झाली. यातील सांगणारा, निवेदन नंतरच्या काळात कथालेखक बनला आणि ऐकणारा श्रोता वाचकांमध्ये परिवर्तित झाला. सांगण्याच्या प्रवृत्तीतून कहाणी जन्मली आणि या कहाणी पासून ते थेट लघुकथेपर्यंत या कथनपर वाङ्मयाने निरनिराळी रूपे प्रकट केली. थोडक्यात सांगण्याची पद्धती बदलली, त्यातील आशय बदलला. मराठीतील



CamScanner

कथात्म लेखनाची काही रूपे मध्ययुगापासून दाखविता येतात. 'परमहंसकथा' हे जैन साहित्यातील कथाकाव्य, महानुभाव संप्रदायातील 'दृष्टांतपाठ', 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभूचरित्र', बौद्ध साहित्यातील 'जातककथा' संत कवींच्या आख्यानपर रचना, पंडित कवींनी गायलेल्या 'स्वयंवरकथा' संतसत्पुरुषांच्या 'चमत्कार'कथा अशी कथेची पूर्वरूपे दाखविता येतात. यात 'सांगणे' हाच भाव प्रबळ आहे. रंजन आणि नीतीशिक्षण यांचा त्यात अंतर्भाव होतो.

लोकसाहित्यातील मौखिक परंपरेतून आलेल्या लोककथा ह्या कथन करणे किंवा सांगणे याच भूमिकेतून आलेल्या दिसतात. ललित वाङ्मयाचे कथासदृश्य रूप मध्ययुगीन काळात प्रकटलेले आढळते. सूक्ष्मरीतीने विचार केला तर यातले सांगणे, कथालेखन म्हणून येत नाही तर त्यांचे प्रयोजन वेगळे होते. जाणीवपूर्वक असे कथालेखन करण्याचा दृष्टिकोन त्यात आढळत नाही. आज रूढ अर्थाने आपण ज्याला कथा म्हणतो ती एकोणिसाव्या शतकात अवतरलेली दिसते. मुद्रणपूर्वकाळात ती दिसते पण वेगळ्या रूपात, मौखिक ते लिखित अशी ही कथेची वाटचाल दिसते.

कथेचा आकार स्पष्टपणे 'स्फुटगोष्टी' पासून आढळतो. त्याअगोदर इंग्रजीतून व संस्कृतमधून भाषांतराच्या रूपातही कथा आढळते. 'करमणूक'या मासिकातून प्रारंभीच्या काळात कथा लिहिलेल्या आढळतात. अभ्यासकांच्या मते अशी कथा सामान्य किंवा दुबळी होती. तरीही कथाविकासातील प्रारंभीची पावले म्हणून त्याकडे बघता येईल. मराठी कथेने स्वतःचे रूप शोधले ते इंग्रजीतील 'शॉर्टस्टोरी'मधूनच याचा अर्थ असा की, कथा लेखन हे आपल्या मूळ परंपरेपासून तुटले. कहाणीपासून लघुकथेपर्यंत या वाङ्मयप्रकाराने निरनिराळे रूप, विशेष स्वीकारलेले दिसतात. व्यक्ती, घटनाप्रसंग, पात्रांच्या कृती, संघर्ष, व्यक्त होणारा अनुभव, संवाद आणि त्यावरचे भाष्य अशी विविध रूपे मराठी कथा विश्वात आढळून येतात. कथा आकाराने लहान असते हे कथेचे ठळक वैशिष्ट्य मात्र कायम आहे.

मौखिक परंपरेतील कथेची रूपे कहाणी, लोककथा, परिकथा, दैवतकथा अशी होती. आधुनिक काळात आधुनिक कथा विकसित झाली. पण तिचे प्रयोजन रंजनवाद वा प्रबोधनपर कथेपेक्षा वेगळे आहे. तिची स्वतःची संघटनातत्त्वे आहेत. तिचे कलासंकेतही वेगळे असल्याचे दिसते. जागतिक पातळीवर कथा या वाङ्मयप्रकाराचा इतिहास केवळ शंभर, दीडशे वर्षाचाच आहे. पण जगातील सर्वात अधिक लोकप्रिय प्रकारही कथाच आहे. अशी नोंद प्रा.म.द. हातकणंगलेकर



यांनी केलेली आहे.

एडगर ॲलन पो या अमेरिकन लेखकाने १८४२ मध्ये कथेच्या स्वरूपाची चर्चा केली. ब्रॅंडर मॅथ्यूज यांनी 'द फिलॉसॉफी ऑफ द शॉर्टस्टोरी:' हा निबंध १९०१ मध्ये लिहिला. त्यातही त्यांनी एडगर ॲलन पो यांनी मांडलेल्या तत्त्वाचा पाठपुरावा केला. एडगर ॲलन पो यांनी कथेला 'गद्य-गोष्ट' असे संबोधले. त्यांच्या मते मोजकी पात्रे, प्रसंग, वातावरण, भाषा इत्यादी घटक कथेत असतात. त्यांची अचूक जुळणी करूनच कथा आकाराला येते व वाचकाच्या मनावर एकच एक संस्कार घडवीत असते. तिच्या या मूळहेतूच्या दृष्टीने आवश्यक तेवढ्याच प्रसंगाची योजना करणे किंबहुना कथेतील पात्र, वातावरणातील सर्वच घटक यातील प्रत्येक तपशील व पूर्वनियोजित संस्काराला पोषक असणे आवश्यक असते. यातूनच एकात्म, एकसंध अशी परिणामकारक कथा सिद्ध होत असते. या आशयाचे एडगर ॲलन पो यांनी केलेले विवेचन हा कथेचे स्वत्व स्पष्ट करण्याचा, तिचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याचा पहिला महत्त्वाचा प्रयत्न होय. त्याने मांडलेल्या कथातंत्राच्या विचाराचा मोठा प्रभाव नंतरच्या काळातील कथा लेखनावर तसेच कथासमीक्षेवर दिसून येतो. परिणामी अनुभवाचे, रचनेचे 'एककेंद्रित्व' हे कथेचे मुख्य वैशिष्ट्ये असते.

कथेच्या अशा एककेंद्री स्वरूपामुळे तिच्या संस्कारात ज्या जातीची एकता येते. तशी अर्थातच कादंबरीच्या संस्कारात संभवत नाही. कादंबरीच्या संस्कारात अनेकविधता असते. तो अधिक व्यामिश्र व भरघोस असा असतो. मात्र पुष्कळदा कादंबरीला साधणार नाही असा एकाग्र व उत्कट परिणाम करून कथा वेगळ्या जातीचे कलात्मक श्रेय मिळविते हे खास. परिणामातील अशी एकाग्रता व उत्कटता हा कथेचा खास गुणधर्म म्हणता येईल.

**कथेच्या व्याख्या**

कथा या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप समजून घेण्यासाठी अनेक अभ्यासकांनी कथेच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता कथा ही प्राचीन काळापासून विविध स्वरूपात पुढे आली आहे. प्रत्यक्षात तिची रूपे इतकी बदलत आहेत की, कथेची नेमकी व्याख्या करणे अतिशय अवघड आहे. एका निश्चित व्याख्येत तिचे स्वरूप स्पष्ट होईल असे नाही. त्यामुळेच तिची निश्चित व्याख्या करणे कठीण असले तरी कथेची काही नेमकी वैशिष्ट्ये सांगता येतील. या व्याख्येच्या आधारेच कथा या वाङ्मयप्रकाराच्या स्वरूपाबाबत चर्चा करता येते.



CamScanner

**१) ना. सी. फडके** - 'कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीगत म्हणजे लघुकथा होय'.

**२) इंदुमती शेवडे** - 'एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा होय.'

**३) वा. ना. देशपांडे** - 'कुशल चित्रकार कुंचल्याच्या चार दोन फटक्यात संपूर्ण चित्र तयार करतो. तसेच या लघुकथा प्रकाराचेही आहे.'

**४) गंगाधर गाडगीळ** - 'नवकथा म्हणजे काही जुन्या कथेच्या वर्तुळाशेजारी काढलेले एक छोटे वर्तुळ नव्हे. नवकथा हे एक मोठे वर्तुळ आहे. जुन्या कथेचे वर्तुळ हा या मोठ्या वर्तुळाचा लहानसा भाग आहे.'

**५) भालचंद्र नेमाडे** - 'लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा, भाषिक अवकाश पुरविणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे'

**६) सुधा जोशी** - 'कथेचे लघुरूप व तिच्या संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत काही विशेष स्वभावतःच येतात. एककेंद्रित्व मितव्यय, संक्षेप, संपृक्तता, काटेकोर नेमकेपणा हे कथेच्या कलातंत्राचे खास विशेष म्हणता येतील.'

**कथेची वैशिष्ट्ये**

लघुत्व आणि एक संस्कारित्व ही कथेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. कथा हा वाङ्मयप्रकार कमीत कमी वेळात एकात्म स्वरूपाचा अनुभव देतो. वरील व्याख्यांच्या आधारे कथेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) लघुकथेची सेंद्रिय एकात्मता, तिची संपूर्णता व स्वयंपूर्णता यातून व्यक्त होणारा एक अनुभवात्मक रूपबंध यांना महत्त्व असते.
२) कथेचे लघुरूप, संस्काराची एकता, रचना, संघटनेतील एककेंद्रित्व, मितव्य, संक्षेप, संपृक्तता, काटेकोर नेमकेपणा हे कथेचे वैशिष्ट्ये आहे.
३) कथा कमीत कमी पात्रे, प्रसंग वापरून थोड्या वेळात वाचकाच्या मनावर परिणामकारक ठसा उमटविते. गुंतागुंत, निरगाठ, उकल अशा अवस्थेतून कथा साकारते.
४) एकाच बैठकीत वाचून वाचकाला आनंद देते.
५) कथेतील अनुभवाची एकात्मता, एकजिनसीपणा, एकविधता आणि संस्कारित्व हे गुण वाचकाला प्रभावित करतात. परिणामातील एकाग्रता व उत्कटता हा कथेचा खास गुणधर्म असतो.



६) वाचकाच्या मनावर एकच एक संस्कार करणे हे कथालेखकाचे ध्येय असते.
७) कथेला अवकाशाची मर्यादा असल्यामुळे तिच्यातून मांडल्या जाणाऱ्या आशयाच्या व्याप्तीला व परिणामाला नैसर्गिक मर्यादा येतात.
८) कथेच्या एककेंद्रीपणामुळे तिच्या संस्कारात एकता ही अपरिहार्यपणे येत असते.
९) अनुभव, आशयसूत्र, कथानक, पात्र, वातावरण, निवेदन आणि भाषा अशी अंगे मिळून कथा आकाराला येते.
१०) कथा हा कलात्मक संघटना व जीवनदर्शन यांना सामावून घेणाऱ्या वाङ्मयप्रकार आहे.
११) कथेचे रूप नेहमीच लवचिक असते. काळानुसार कथेचे स्वरूप बदलत असते.

**कथात्म साहित्यापेक्षा कथेचे वेगळेपण**

कथा-कादंबरीच्या रूप वैशिष्ट्यांची थोडक्यात चर्चा केल्यानंतर आपल्याला या दोन वाङ्मयप्रकारात असणारा फरक विचारात घेणे गरजेचे वाटते.

कथा आणि कादंबरी हे कथात्मक वाङ्मयाचे प्रकार असले तरी त्यांच्यात मूलभूत स्वरूपाचे भेद आहेत. कथा व कादंबरी यामध्ये आकारभेदाबरोबरच प्रकारभेद असल्याचे स्पष्ट दिसते. हे दोन्ही कथात्मक साहित्यातील वाङ्मयप्रकार असल्यामुळे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण इत्यादी घटकांच्या स्वरूपात व उपयोजनात भिन्नता आढळते. कादंबरी हा विस्तृत भाषिक अवकाशप्राप्त वाङ्मयप्रकार असल्यामुळे जीवनाचा सर्वांगीण, समग्र वेध घेण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला असतो. अशी समग्रता कथेत शक्य नसते. म्हणण्यापेक्षा अभिप्रेतच नसते. कथेत समग्र जीवनातील एखाद्या तुकड्याचे चित्रण केलेले असते. याबाबत सुधा जोशी म्हणतात, 'कथेच्या स्फुटस्वरूपामुळे जीवनाच्या समग्रत्वाचे समावेशन तिच्यात असत नाही.'

कादंबरीचा चित्रफलक हा विस्तृत आणि व्यापक स्वरूपाचा असतो. कादंबरीकाराला चित्रणासाठी विस्तीर्ण अवकाश उपलब्ध असतो. त्यामुळे तिचा आवाका मोठा असतो. कथेचा चित्रफलक मर्यादित आकाराचा व मर्यादित अवकाश असलेला असतो. त्यामुळे तिचा आवाकाही मर्यादित असतो. पण याबाबत रा. भा. पाटणकर यांनी असे मत मांडले आहे की, 'कथेचा आवाका कादंबरीच्या आवाक्यापेक्षा लहान असतो हे खरे, जीवनदर्शनाच्या बाबतीत जे



CamScanner

कादंबरीत साधता येते. ते कथेत साधता येत नाही. हे ही खरे... पण काही प्रमाणातच जर कथाकाराने आपल्या कथांमधून जीवनातील महत्त्वाच्या समस्यांना भिडण्याचा सातत्याने प्रयत्न केला असेल तर त्याच्या संदर्भात कथेच्या आवाक्याचा प्रश्न अजिबात महत्त्वाचा ठरणार नाही. कथा या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातूनही संपूर्ण जीवनविषयक मर्मदृष्टी मिळू शकते.' पण हे रा.भा. पाटणकरांचे मत अपवादात्मक स्वरूपात स्वीकारण्यासारखे आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

कथा आणि कादंबरी यांच्यातील फरक पाहत असताना असे दिसते की, स्थलकालाचा, घटनांचा विस्तीर्ण पट कादंबरीत चित्रीत होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीचा संपूर्ण जीवनप्रवास कादंबरी कवेत घेऊ शकते. याउलट कथा सामान्यत: व्यक्तीच्या जीवनातील विशिष्ट टप्प्याचे, एखाद्या जीवनानुभवाचे चित्रण साधताना दिसते. व्यक्तीच्या समग्र जीवनाचा संदर्भ जरी विशिष्ट कथेत असला तरी प्रत्यक्ष कथाविषय व्यक्तीचा विशिष्ट जीवनखंड व विशिष्ट जीवनानुभव असल्याचे दिसून येते. याबाबतचे विवेचन गंगाधर गाडगीळ यांनी अधिक योग्य प्रकारे केले आहे. ते म्हणतात, 'एका व्यक्तीचे विविध अवयव जसे एकमेकांशी जोडलेले असतात तसे लघुकथांच्या घटकांचे नाते असते. एका कुटुंबातील व्यक्तींचे ज्या प्रकारे एकमेकाशी नाते असते. तसे कादंबरीतील घटकांचे असते.' म्हणजे दोन्ही साहित्यप्रकारांच्या घटकांचे परस्पराशी कलात्मक नाते हे असतेच पण लघुकथेतल्या घटकांचे नाते घट्ट असते. ते परस्पराशी जोडलेले असतात. याउलट कादंबरीतल्या घटकांचे नाते सैल असते ते परस्पराशी जोडलेले असतात पण जखडलेले नसतात. त्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या परिघात स्वतंत्रपणे विकास होऊ शकतो.'

व्यक्तिरेखा व प्रसंग यामध्ये कालगतीने होत जाणारी स्थित्यंतरे जशी प्रत्यक्ष जीवनात आढळतात. तशी ती कादंबरीत चित्रित करीत जाणे शक्य नसते. कारण कादंबरीला काळाचा व अवकाशाचा मोठा पल्ला उपलब्ध असतो. कथेत अशा चित्रणाला वाव नसतो. कथा अनेकदा व्यक्तिजीवनातील किंवा समाजजीवनातील एखाद्या विशिष्ट अवस्थेला भिडताना दिसते. एखाद्या भावस्थितीवर केंद्रित होऊन किंवा प्रसंगातून आकारणारी अशी कथा असते. कथेत रचनेचे, अनुभवाचे एककेंद्रित्व असते तर कादंबरी अनेककेंद्री असते. हा त्यांच्यातील एक महत्त्वाचा भेद सांगण्यात येतो. कादंबरीत अनेक केंद्रे असतात. अनुभवाच्या अनेकविध संघटना असतात. या संघटनांचा परस्पर अनुबंध असतो. तसेच त्यांना स्वायत्त असे अस्तित्व असते. त्यांच्यात स्वतंत्र विकसनशीलता असते. यातून कादंबरीच्या अनुभवार्थात विशेष व्यामिश्रता येते, तसेच तिच्या संघटनेत विशिष्ट जातीचा लवचिकपणा, मोकळेपणा येतो.



कथेत कादंबरीतल्याप्रमाणे स्वतंत्र विकास घडवू शकतील अशा भिन्न आशयसूत्रांचा समावेश नसतो. कथेतील अनुभवात एकता असते. कादंबरीच्या तुलनेत तिच्यातील अनुभव, घटना, व्यक्तिरेखा, प्रसंग, भाववृत्ती इत्यादी घटक तसेच त्यांच्यातील परस्परसंबंध गंगाधर गाडगीळ यांनी म्हटल्याप्रमाणे मर्यादित असतात. यामुळे स्वाभाविकपणे कथेला लघुत्व प्राप्त होऊन तिच्यातून सामान्यत: एकच एक संस्कार उमटलेला दिसतो. कथेच्या एककेंद्री स्वरूपामुळे तिच्या संस्कारात एकता येते.

कथा आणि कादंबरी यांच्यात प्रकृती धर्मातील या वेगळेपणामुळे त्यांच्या शैलीवरही परिणाम होत असतो, असे मत गंगाधर गाडगीळ यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात, भावकाव्याशी नाते सांगणाऱ्या शैलीत लघुकथा लिहिता येते. परंतु या शैलीत कादंबरी लिहिणे अवघड जाते. कादंबरीची शैली ही अधिक गद्य प्रकृतीची असावी लागते. याचा अर्थ असा नव्हे की गद्य प्रकृतीच्या शैलीत कथा लिहिता येत नाही. मोपासा, मॉम इत्यादीच्या कथा गद्यशैलीतल्या आहेत. परंतु कथेची शैली गद्य असली तरी तिच्यात एक प्रकारचा हलकेपणा असतो निदान असावा लागतो. गंगाधर गाडगीळ यांच्या या विवेचनाबाबत मतभेद होण्याची शक्यता असली तरी कथा आणि कादंबरी यांच्या शैलीत प्रकृती धर्मानुसार आशयानुसार फरक पडत असतो असे स्पष्ट जाणवते.

उपरोक्त विवेचनातून कथा आणि कादंबरी यांच्यातील स्वरूप भेद आपण पाहिले असले तरीही काही मुद्द्यांचा आणखी विचार करणे गरजेचे आहे. कादंबरीचे लघुरुप म्हणून कथेकडे पाहणे किंवा कथेचे विस्तारित रूप म्हणून कादंबरीकडे पाहणे योग्य होणार नाही. कारण या दोन्ही वाङ्मयप्रकाराची बलस्थाने वेगळी आहेत. त्यांची चर्चा आपण वर केलेली आहे. त्याचबरोबरच यातील कोणत्याच वाङ्मयप्रकाराला गौण ठरवता येत नाही. त्यामुळे दोन्ही स्वतंत्र विकसनशील वाङ्मयप्रकार आहेत हे प्राधान्याने लक्षात घेतले पाहिजे.

**कथेचे घटक**

कथा हा लघुत्तम कथात्मक साहित्यप्रकार आहे. प्रत्येक साहित्यप्रकाराला स्वत:ची अशी एक संरचना असते. या संरचनेतून साहित्यप्रकाराचा आकृतिबंध निर्माण होतो. मानवी शरीरातील अवयव ज्याप्रमाणे परस्परसंबंधित व पूरक असतात. त्याचप्रमाणे साहित्यकृतीचे घटकावयव एकमेकांशी पूरक असतात. कथेच्या संरचनेचा विचार करताना त्यामध्ये कथानक, पात्र, वातावरण, निवेदन



CamScanner

व भाषा या पाच मुख्य घटकांचा विचार महत्त्वाचा ठरतो. कथेचे रचनातत्त्व स्पष्ट होताना कथेचे हे पाचही घटक एकमेकांशी सलग्न असतात. हे पाचही घटक स्वतंत्र असूनही एकमेकांशी परस्परपूरक असतात. हे लक्षात घ्यावे लागते. लेखक आपल्या आशय व दृष्टिकोनानुसार साहित्यकृतीचा आकृतिबंध ठरवत असतो. लेखकाजवळ जेव्हा अल्प आशय व कमी पात्रे, थोडकेच प्रसंग व अनुभव व्यक्त करण्याची क्षमता असते. तेव्हा कथेसारखा आकृतिबंध त्याच्यासमोर उभा राहतो. यातून तो घटकाची जुळणी व मांडामांड करतो.

**१. कथानक**

कथानक हा कथेचा मुख्य घटक आहे. कथेमध्ये कल्पित वास्तवविश्व निर्माण होत असते. हे विश्व विशिष्ट पद्धतीने कथन केले जाते. गोष्टींमध्ये घटना-प्रसंग हे कालानुक्रमे सांगितलेले असतात. तर कथेतील घटना-प्रसंग हे कालानुक्रमाबरोबर कार्यकारणभावाने परस्पराशी गुंफलेले असतात. म्हणून कालानुक्रम आणि कार्यकारणभावाने घटना, प्रसंगाची केलेली गुंफण म्हणजे कथानक होय. कादंबरीच्या तुलनेत कथेच्या कथानकाचा आवाका छोटा असतो. कथानकातील विषय, आशय, मूल्यविचार, समाजभान यांनाही महत्त्व असते.

कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपद्धती व भाषा हे कथेचे मूलघटक होत. त्यांच्या आश्रयाने कथाकार कथा निर्मिती करीत असतो. तो कथेत निवेदकाच्या दृष्टिकोनातून विशिष्ट अनुभव कथन करीत असतो. निवेदक घटना-प्रसंगांचे, पात्रांच्या कृतींचे व अन्य तपशिलांचे निवेदन करीत असतो. हे निवेदन म्हणजे केवळ जंत्री नसते. या घटना-प्रसंगाची, पात्रांच्या कृतीची, अन्य तपशिलांची कथेत अर्थपूर्णरीतीने गुंफण केलेली असते. या गुंफणीमागे एखादे विशिष्ट संघटनतत्त्व अंतर्भूत असते. त्यातूनच कथानकाला विशिष्ट रूप लाभत असते. या कथानकातून कथागत अनुभवार्थ साकारला जातो.

कथेतील पात्रे अनेकदा आपल्या कृतींने घटना घडवित असतात. तर कित्येकदा घटना पात्रांना घडवीत असतात. घटना व पात्र अशाप्रकारे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात. म्हणजेच कथानक हा कथेतील एक गतिशील घटक असतो. कथेत घटनांचा प्रवाह कथांकित केलेला असतो असे म्हणता येईल. या प्रवाहामागे कथेतील पात्रांच्या हेतूची गुंफण असते. पात्रांच्या या हेतूमागे कथानिवेदकाचा हेतू क्रियाशील असतो आणि त्याही मागे तो निवेदक निर्माण करणाऱ्या लेखकाचा कलाहेतू व मूल्यभाव गर्भित असतो. पात्रांचा हेतू व निवेदकाचा हेतू अशा दोन प्रकारच्या हेतुतून कथाकार कथेतील घटनांची, कृतीची तसेच अन्य तपशिलांची निवड करतो आणि त्यांच्या गुंफणीतून विशिष्ट प्रकारचे कथानक निर्माण करतो. या कथानकात गुंफल्या जाणाऱ्या घटना बाह्य स्वरूपाच्या असू शकतात तसेच त्या मानसिक स्वरूपाच्याही असू शकतात.



मानवी जाणीव हेच नेहमी कथेतील भावविश्वाचे केंद्र असते असे नाही. या जाणिवेपलीकडच्या नेणीवेलाही कथेत स्थान मिळत असते. यामुळे कथेतील अनुभवरूपात मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून येते. अशा वेळी कार्यकारणभाव व कालानुक्रम ही कथानकाच्या संघटनेतील प्राथमिक स्वरूपाची तत्त्वे बाजूला पडण्याची शक्यता असते. कथेच्या कलाहेतूनुसार कथानकाची गुंफण अनेकविध तऱ्हांनी केली जाऊ शकते. एकूण कथासाहित्य विचारात घेतल्यास त्यातून कथानकाच्या संकल्पना व उपयोजन यांचे विविध नमुने आढळतील. कार्यकारणभाव व कालानुक्रम या तत्त्वांच्या आधारे केलेली घटनांची गुंफण म्हणजे कथानक ही एक प्रधान संकल्पना होय.

**२. व्यक्तिचित्रण**

पात्र हा कथात्म साहित्यकृतीचा एक महत्त्वाचा मूळ घटक होय. पात्र म्हणजे काय? या संदर्भात सुधा जोशी म्हणतात, कथा-कादंबरीत शब्दातून मूर्त केलेली एखाद्या व्यक्तीची प्रतिमा म्हणजे पात्र. व्यक्तीचे बहिरंग आणि तिचे अंतरंग म्हणजे तिचे बोलणे वागणे, स्वभावविशेष, तिच्या वृत्ती-प्रवृत्ती, तिचे भावविश्व, तिची जीवनदृष्टी, जीवनसरणी इत्यादीच्या चित्रणातून पात्राची विशिष्ट प्रतिमा साकार होते. ना. सी. फडके यांनी पात्रघटकाला प्राधान्य देणारी भूमिका स्वीकारली आहे, ते म्हणतात, 'कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललित कथेचे अधिक महत्त्वाचे अंग आहे,' 'कथानकातून व्यक्ती निर्माण होत नाहीत तर व्यक्तीतून कथानक निर्माण होत जाते.' हा त्यांच्या विवेचनाचा निष्कर्ष आहे.

कथागत अनुभवार्थ हा कथानकाप्रमाणेच पात्र या कथांच्या आश्रयानेही सिद्ध होत असतो. पात्रांचे प्रमुख कथात्मकार्य ही कथार्थाची निर्मिती हेच असते. कथाकार एखाद्या व्यक्तीची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादीच्या चित्रणातून त्या व्यक्तीची एक शब्दरूप प्रतिमा कथेत निर्माण करतो. व्यक्तीच्या या शब्दरूप प्रतिमेला पात्र असे म्हटले जाते. ही कथागत पात्रे शब्दरूप असली तरी त्यांना प्रत्यक्ष वास्तवातील माणसाप्रमाणे शारीरिक, मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात, कथागत प्रत्येक पात्राला स्वतःचे स्व विशिष्ट असे भावविश्व किंवा व्यक्तित्व लाभलेले असते. परंतु हे पात्र प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणे स्वतंत्र नसते. कथार्थाची निर्मिती हे त्याचे



CamScanner

कार्य असल्याने ते त्या कथार्थाला बांधलेले असते.

कथागत पात्र हे कथासंहितेचा अंगभूत घटक म्हणून जसे क्रियाशील असते, तसेच दुसऱ्या अंगाने या पात्राचे भावविश्व प्रत्यक्षातील मानवीविश्वाशी विशिष्ट प्रकारचे नाते प्रस्थापित करीत असते. कथेतील पात्रे ही सामान्यतः प्रत्यक्षातील माणसांच्या अनुकृतीतून निर्माण झालेल्या शब्दरूप प्रतिमा असतात. कथागत पात्र निर्माण करत असताना कथाकाराला काही नैसर्गिक मर्यादा पडत असतात. एखाद्या पात्राचा संपूर्ण जीवनप्रवास कथेत चित्रित केला जाऊ शकत नाही. पात्र चित्रणातील विस्ताराला, तपशिलांच्या भरगच्चपणाला कथेत वाव नसतो. मर्यादित अवकाशात मोजक्या साधनांनी प्रयोजनपूर्ण पात्रनिर्मिती साधने हे कथाकारासमोरील एक कलात्मक आव्हान असते.

### ३. वातावरण

कथा एका विशिष्ट स्थलकाळाच्या चौकटीत, एका विशिष्ट भौगोलिक तसेचसामाजिक, सांस्कृतिक परिसरात घडत असते. याबरोबरीने कथेतून एखादी भाववृत्तीही प्रकट होत असते. या सर्व घटकातून कथेतील वातावरण तयार होत असते. वातावरण हा कथेच्या संरचनेचा एक घटक आहे. कथानक हे स्थलकालाच्या अवकाशामध्ये घडत असते. हे अवकाश वास्तव कल्पित असते. या अवकाशाच्या पार्श्वभूमीवर पात्र, घटना, प्रसंग घडत जातात. चित्रकार हा चित्र काढण्यासाठी जसा कागद या पार्श्वभूमीचा वापर करतो. तसा निवेदक हा कथेमध्ये निवेदन आणि वर्णनातून, स्थलकालाचा अवकाश निर्माण करीत असतो. त्यामुळे कथेमध्ये 'फार फार वर्षापूर्वीचा काळ होता. एक होता... अशा निवेदनातून भूतकाळाचे वातावरण तयार होऊ लागते. एखाद्या रणसंग्रामाच्या वर्णनात तलवारीचा खणखणाट येऊ लागला की ऐतिहासिक वातावरण तयार होऊ लागते.

कथाकाराने वातावरणाच्या तपशिलांच्या केलेल्या निवडीमागे त्यांची कलादृष्टी असते. विशिष्ट कथाहेतूसाठी त्याचे उपयोजन होत असते. कथेतील वातावरणाचे अस्तित्व पार्श्वपटासारखेच नसते. वातावरण हा कथार्थाच्या निर्मितीतील एक क्रियाशील घटक असतो. कथेतील वातावरणाचे प्राथमिक स्वरूपाचे प्रयोजन म्हणजे कथेसाठी एक कल्पित परिसर निर्माण करणे हे होय. विशिष्ट स्थलकालाच्या चित्रणामुळे कथेतील वातावरण कल्पनेच्या पातळीवर संवेद्य होत असते. मात्र वातावरणाचा घटक केवळ याच स्तरावर क्रियाशील असतो असे नव्हे. तो त्याबरोबर इतर स्तरावरही क्रियाशील असू शकतो. कथेतील पात्र, घटना, प्रसंग नाट्य, संघर्ष याबाबत वातावरण हा घटक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत



असतो.

कथा निर्मितीमध्ये 'लेखकाचा दृष्टिकोन'या घटकाला महत्त्व असते. कथेतील घटनामागे पात्रांचे विविध प्रकारचे हेतू दडलेले असतात. या घटनामागे लेखकाची जीवनसरणी व मूल्यप्रणाली उभी असते. कथेतील शब्दार्थमय कहाणी निवेदक पात्रांकडून सांगितली जाते. या निवेदक पात्रांची एक जीवनदृष्टी असते. या जीवनदृष्टी व कथाहेतूमागे लेखकाची व्यापक भूमिका असते. लेखक हा कलावंत असल्यामुळे जीवनात घडणाऱ्या घटना, प्रसंगाचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम होतो. त्यामुळे त्याच्या मनात काही प्रतिक्रिया तयार होतात. या प्रतिक्रियांना नैतिकतेचा आधार असतो. यातून लेखकाचा विशिष्ट दृष्टिकोन दिसून येतो. कथानकामध्ये विशिष्ट घटना-प्रसंगाची निवड करून त्यांची विशिष्ट दृष्टिकोनाने जुळणी करून लेखक कथेला कलात्मकता आणि कथनात्मकता प्राप्त करून देतो.

### ४. निवेदन

निवेदन, कथन हे शब्द एकमेकाचे पर्यायी शब्द आहेत. कथा सांगणारा कुणीतरी असावा लागतो, त्याला निवेदक म्हणतात. हा निवेदक जे सांगतो, ते कथन, निवेदन होय. येथे सांगणे आणि कथन, निवेदन यांच्यामध्ये काही साम्यभेद आहेत. कथन निवेदनामागे लेखकाचा कलाहेतू, मूल्यभाव असतो. निवेदकाच्या निवेदनातून कथानक साकार होत असते. निवेदक हा विशिष्ट पद्धतीने घटना प्रसंगाचे निवेदन करीत असतो. लेखकाचा कलाहेतू, मूल्यभावामुळे कथानकाच्या प्रारंभ आणि शेवटामध्ये अर्थपूर्ण नाते निर्माण होत असते.

निवेदन हे कथात्मक साहित्याच्या वर्गातील इतर प्रकाराप्रमाणे कथेचेही एक व्यवच्छेदक वैशिष्ट्ये होय. सामान्यतः कथाकार कथा सांगण्यासाठी एक निवेदक पात्र निर्माण करतो. त्या निवेदक पात्राच्या विशिष्ट दृष्टिकोनातून वाचकाला कथा सांगत असतो. निवेदक पात्राच्या या दृष्टिकोनातून कथेतली विविध घटकांची विशिष्ट रीतीने संघटना करत असतो. अशा प्रकारे तत्त्वतः कथेतील समग्र भावविश्वाचे सूत्रचालन कथाकार करत असतो.

कथावस्तूशी एकरूप होऊन लिहिणे, समरसून निवेदन करणे व तिच्याकडे अलिप्तपणे पाहून निवेदन करणे हे निवेदनाचे मुख्य दोन प्रकार म्हणता येतील. अर्थातच या दोन प्रकारात कथार्थानुसार विविध छटा संभवतात. निवेदनातील दृष्टिकोनाच्या अनुषंगाने कथानिवेदकाचे प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी किंवा निवेदक हे कथेतील एक पात्र असते. हे पात्र कथेत केंद्रवर्ती असेल किंवा दुय्यम स्वरूपाचे



CamScanner

असेल. तृतीयपुरुषी निवेदक कथेबाहेरील एक निवेदक पात्र असते. कधी हा निवेदक सर्वज्ञ, सर्वसाक्षी असतो. तर कधी तो तसा नसतो. तो केवळ एक सामान्य निरीक्षक असतो. कथेचा निवेदक कोण असावा आणि त्याचे स्वरूप कोणते असावे याची निश्चिती हा कथाकारांनी त्याच्या कला हेतूनुसार घेतलेला एक निर्णय असतो आणि कथार्थाच्या निर्मितीतील तो एक महत्त्वाचा घटक असतो.

कथा निवेदक कथेत पात्र प्रसंगादीचे वर्णन वा कथन करतो. त्याविषयी कधी संक्षिप्त, साररूप निवेदन करतो. त्याचप्रमाणे काही वेळा तो पात्रप्रसंगादीवर भाष्यही करत असतो. या भाष्याद्वारे तो कित्येकदा पात्रांच्या मनःस्थितीचा, त्याच्या कृतीचा किंवा एखाद्या प्रसंगाचा अर्थ उलगडून सांगत असतो. काही वेळा अर्थ विवरणाबरोबरच मूल्यमापन ही करत असतो. त्यामागे निश्चित स्वरूपाच्या नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असते. याशिवाय निवेदक हा भाष्याद्वारे माणसासंबंधीचा तसेच एकूण जीवनासंबंधीचा सर्वसामान्य स्वरूपाचा तत्त्वविचारही मांडत असतो.

कथन, वर्णन, भाष्य आणि संवाद या चार प्रकारांद्वारे आकारणाऱ्या निवेदनातूनच घटनाप्रसंग, पात्र, वातावरण यांची निर्मिती होत असते. निवेदनाच्या या चारही प्रकारातील किंवा घटकातील प्रत्येकाला त्याचे स्वतःचे असे एक विशिष्ट कथात्मक कार्य किंवा प्रयोजन असते. ते अर्थातच त्या त्या कथेनुसार निश्चित होत असते. कथनवर्णनादी हे चार निवेदनप्रकार मिळून एकात्मपणे कथाविश्वाची निर्मिती करीत असतात. कलापूर्ण कथेत याचा प्रत्यय आपल्याला येतोच.

**५. भाषा**

कथेची संहिता भाषेने साकार होत असते. कथेची भाषा ही एका कल्पित विश्वाची भाषा असते. ते कल्पित विश्व निर्माण करणारी ती भाषा असते. एखाद्या कथेसाठी कथाकार विशिष्ट भाषिक खंडाची निवड करतो. तसेच तो विशिष्ट रीतीने भाषेचा वापर करतो. त्याने केलेल्या या भाषिक खंडाच्या व वापराच्या निवडीमागे त्याची कथादृष्टी असते.

कथागत अनुभवार्थानुसार कथाकाराची विशिष्ट भाषा निश्चित होत असते. भाषा हा एका अर्थाने निवेदनाचा घटक ठरतो. साहित्य निर्मितीसाठी भाषेचा वापर करताना ललित लेखकासमोर नेहमीच एक आव्हान असते. भाषेची स्वाभाविक तर्कशुद्ध घडण, तिचे व्याकरण किंवा नियमव्यवस्था आणि लेखकाला व्यक्त करायचे असलेले अनुभव, तर्कनिष्ठ नसलेल्या अशा अनुभवसंगती यामधील



द्वंद्वातून, विरोधी ताणातून हे आव्हान निर्माण होत असते. यासाठी त्याला भाषेचे रूढ संकेत मोडून, नियमोल्लंघन करून तो नव्या भाषिक अभिव्यक्ती सिद्ध करतो. आणि त्यातून अभिप्रेत कथार्थाची निर्मिती साधतो.

कोणत्याही साहित्यकृतीची भाषा ही लेखकाने मुद्दाम घडविलेली भाषा असते. लेखकाच्या भाषेचा लय, सूर आणि बाज यावर कथेची भाषा ठरत असते. कथेच्या परिणामकारकतेमध्ये भाषा हा घटक ही महत्त्वाचा ठरतो. कथानक गतिमान करणे, प्रसंगांना नाट्यात्मकता देणे, घटनांचे गांभीर्य निर्माण करणे, पात्रांच्या बोलण्यातील आरोह अवरोहासह त्यातील मिश्किल व गांभीर्य लेखक भाषेद्वारे व्यक्त करतो. भाषेची निर्मिती लेखकच करत असतो. लेखकाची अनुभवाची भाषा व त्याची मातृभाषा हीच बऱ्याच वेळा त्याच्या कथेत, संहितेत स्रवत असते. लेखकाची व्यक्तिगत पार्श्वभूमी व त्याची सामाजिकता यातूनही लेखकाची पर्यायाने कथासंहितेची भाषा ठरत असते.

कोणत्याही साहित्यप्रकाराप्रमाणेच कथेलाही तिचे तंत्र, किंवा कलासंकेत असतात. तंत्र म्हणजे अर्थातच कारागिरी किंवा बंदिस्त नियमावली नव्हे. तसेच तंत्र ही अमूर्त स्वरूपाची, एखाद्या पोकळीत आकारणारी गोष्ट नव्हे. ती विशिष्ट साहित्यकृतीच्या संदर्भात आकारणारी, सार्थ ठरणारी गोष्ट होय. प्रत्येक साहित्यप्रकार सतत घडतही असतो आणि बदलतही असतो. आकाराला येऊ पाहणारी प्रत्येक नवी कथारूप साहित्यकृती ही कथा या साहित्यप्रकारातून नवी मागणी करत असते.

**कथेचे उपप्रकार**

मराठी मौखिक परंपरेत लोककथा, नीतिकथा आणि दैवतकथा, नक्षत्रकथा, व्रतकथा, आख्यायिका इत्यादी कथाप्रकार सापडतात. हे सर्व मौखिक परंपरेतील कथाप्रकार असतात. आंग्लसंपर्कातून मराठीत स्थिर झालेल्या लघुकथा वाङ्मयप्रकाराला बळ पुरवत असतात. यातूनच मराठी लघुकथा अधिक सशक्त बनत गेल्याचे आपल्याला जाणवते. कथासाहित्यात कथेचे अनेकविध उपप्रकार दिसून येतात. कथेचा उपप्रकार म्हणून दीर्घकथेचा उल्लेख सर्वप्रथम करावा लागतो. दीर्घकथेत विस्तार शक्यता अधिक असतात. त्यामुळे तिचा आवाकाही अधिक व्यापक असतो. पर्यायाने दीर्घ कथेतील जीवनदर्शन लघुकथेच्या तुलनेत अधिक सखोल असते. तिच्या परिणाम शक्यताही अधिक असतात. पण ती बहुकेंद्रीय नसल्यामुळे, आशयसूत्रांची व्यामिश्रता टाळल्यामुळे ती लघुकादंबरीपेक्षा वेगळी ठरते.



CamScanner

कथेचा दुसरा प्रकार म्हणून लघुत्तम कथेचा उल्लेख करावा लागतो. एखादे बारीक असे सूत्र कमीत कमी शब्दांच्या सहाय्याने लघुत्तम कथा मांडते. रूपककथा किंवा दृष्टांत कथांचा विचार लघुत्तम कथा म्हणून करता येतो. लोकपरंपरेत या प्रकारची उदाहरणे विपुल प्रमाणात सापडतात. मराठीत अशा स्वरूपाची कथा विरळ स्वरूपात सापडते.

मराठीत असाच विरळ स्वरूपात लिहिला गेलेला कथेचा उपप्रकार म्हणजे कथामालिका होय. एकाहून अधिक कथा मिळून मालिकाकथा आकाराला येते. मालिकाकथेतील प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्त्व असते. मालिकाकथा म्हणजे कथामाला नव्हे. समान पात्रसंच, वातावरण व भाववृत्ती असलेल्या कथांच्या समूहातून कथामाला आकाराला येते. तसे पाहता कथामालेतील प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्व असते. ती एक स्वतंत्र सुट्टी कथा म्हणून वाचता, आस्वादता येते. पण इतर कथाहून कथामालेतील कथांचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना परस्पर संदर्भाचे अधिकचे परिमाण असते. कथामालेला तत्वतःपूर्णविराम नसतो की जसा मालिकाकथेला असतो. असे सुधा जोशी नोंदवतात. जे अधिक बरोबर आहे. असाच कथेचा आणखी एक उपप्रकार म्हणून साखळीकथांचा उल्लेख करावा लागेल. साखळी कथांचे तंत्र आपल्या प्राचीन गद्यात अधिक प्रमाणात वापरलेले दिसते. उपरोक्त सर्व प्रकार रचनादृष्ट्या कथेचे उपप्रकार होत. याशिवाय अनुभवाच्या अंगाने विचार करता ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, ग्रामीण, प्रादेशिक, दलित, विज्ञान कथा, फँटेशी, गूढकथा, रहस्यकथा इत्यादी प्रकार सांगता येतील.

●●

● संदर्भ


१. मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा.गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
२. साहित्यः अध्यापन आणि प्रकार, संपा.श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई
३. लघुकथा लेखन : तंत्र आणि मंत्र- संपा.ना.सी.फडके, व्हीनस प्रकाशन, पुणे
४. कथा संकल्पना आणि समीक्षा- संपा.सुधा जोशी, मौज प्रकाशन, मुंबई
५. प्रतिभासाधन- संपा.ना.सी.फडके,प्रकाशन देशमुख आणि कंपनी, पुणे
६. मराठी साहित्य प्रवाह, प्रकार आणि प्रतिबिंब- संपा.डॉ.सतीश कामत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर




CamScanner